# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १४६/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सदाशिव मल्हारी सातपुते,<br>मु.पो. दरीकोणूर, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सदाशिव मल्हारी सातपुते, मु.पो. दरीकोणूर, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार हा वितरण कंपनीचा दि. १४.९.१९९४ पासून अेजी- ९८८ (२७०२८०२७५९८८) ग्राहक आहे. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरण कंपनीस दिलेल्या आदेशानुसार सर्व शेतीपंप ग्राहकांना मीटर बसविणेचे आहेत. या ग्राहकाने संख उप विभागातील शाखा कार्यालय दरीकोणूर यांचेकडे दि. १२.५.२०१० रोजी मीटर बसवून देणे बाबत अर्ज केला परंतु आजतागायत मीटर बसविलेले नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २८.९.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. १५.११.२०११ रोजी कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत कालावधीत मीटर बसवावा व विलंबाबाबत भरपाई देणेत यावी असे आदेश दिले. मंचाकडून अपेक्षित मदत - विद्युत मीटर एका निश्चित कालावधीत बसवून देण्याचे वि.प.ला आदेश व्हावेत, विलंबाबद्दल भरपाई मिळावी, विलंबाची निश्चिती झाली नसलेस कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाईसाठी वेगळा अर्ज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनी कवठे महांकाळ विभाग यांनी आपल्या दि. ५.१.२०१२ च्या लेखी अहवालात तक्रारदार यांचे वीज कनेक्शन दि. १४.९.१९९४ पासून व्हॉर्स पॉवर पध्दतीने देणेत आलेले होते. मिटरच्या उपलब्धतेनुसार त्यांना दि. १.१.२०१२ रोजी मीटर बसविण्यात आलेले आहे. तसेच अर्जदारानी झलेल्या नुकसानीबाबतचे पुरावे दिलेले नाहीत,. ही बाब लक्षात घेवून त्यांनी मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. कदम उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि.११.१.२०१२ च्या लेखी म्हणण्यात मीटर बसविण्यास विलंब झाल्याचे मान्य केले. तक्रारदारास दि. १.१.२०१२ रोजी मीटर बसविण्यात आलेले आहे, त्याचा क्रमांक ०१५८४४६ असल्याचे नमूद केले आहे.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे मीटर बसविणेस झालेल्या विलंबापोटी भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदाराने आपल्या दि. ८.१.२०१२ तक्रारीत प्रमुख मागणी मीटर बसविण्याचे वि.प.ला आदेश व्हावेत अशी केली आहे. वि.प.ने आपल्या दि. ७.१.२०१२ च्या लेखी अहवालात दि. १.१.२०१२ ला मीटर बसविलेचे म्हटले आहे, परंतु प्रत्यक्षात ते दि. १०.१.२०१२ ला बसविण्यात आले आहे. अंतर्गत कक्षाने कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत कालावधीत मीटर बसवावा व विलंबाबाबत भरपाई देणेत यावी असे आदेश दिले. ग्राहकाची दुसरी मागणी विलंब किंती झाला हे निश्चित झालेस कृती मानके विनियमानुसार भरपाई मिळावी. ग्राहकाने दि. १२.५.२०१० रोजी मीटर बसवून देणे बाबत अर्ज वि.प.कडे केला. कृती मानके विनियम २००५ सोबतच्या परिशिष्ट अ, अ.क्र. ७ मधील इतर कृतीमध्ये कृषी पंप ग्राहकाचे मीटर रिडींग ३ महिन्यातून एकदा घेण्याचे निर्देश दिले आहेत. या ठिकाणी ग्राहकाची मागणी Change of tariff शेतीपंपाचे एच.पी. च्या ऐवजी मिटर रिडींगवर आधारीत वीज देयके मिळावीत अशी आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

मा.आयोगाचे Schedule of Charges मंजूर करतांनाचे आदेश आहेत. ग्राहकाने दि. १२.५.२०१० ला मीटर बसविण्याची मागणी केली, त्या तारखेपर्यंत वि.प.ने त्यांना मीटर बसविलेला नाही. तक्रारदार ग्राहकाने मागणी केल्यानंतर जवळ जवळ १९ महिन्यानंतर दि. १०.१.२०१२ ला मीटर बसविला आहे. वितरण कंपनीने मिटरच्या उपलब्धतेनुसार सदरचा मीटर बसविणेत आला असास बचाव घेतला, परंतु या बचावामुळे Change of tariff किंवा Schedule of Charges मा. आयोगाने मंजूर केल्यानुसार अंमलबजावणीची वि.प.ची जबाबदारी कमी होत नाही किंवा वि.प.ला ती टाळता येणार नाही. मीटरची उपलब्धता हे कारण लंगडी सबब आहे. त्यामुळे ग्राहकाच्या मागणीनुसार विलंब १९ महिने निश्चित झाला आहे, त्यावर प्रचलित बिलींगप्रमाणे शेती बील देण्याच्या पध्दतीनुसार ६ महिन्याचा कालावधी वजा केला असता, दि. १२.१२.२०१० ते दि. १२.१.२०१२ असा १३ महिन्यांचा विलंब झाला आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार पहिल्या महिन्याला रु. १००/- व त्यानंतरच्या प्रत्येक महिन्यास रु. २००/- या प्रमाणे एकूण रु.२५००/- मिळण्यास ग्राहक हक्कदार आहे व वितरण कंपनीची ती जबाबदारी आहे. ग्राहकाने आपल्या तक्रारीसोबत जून २०११ चे बील जोडले आहे, त्यामध्ये थकबाकी आहे असे दिसते. त्यामुळे भरपाईची रक्कम रु. २५००/- ग्राहकास देतांना त्या रकमेचे प्रथम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन झाल्यानंतर उर्वरित भरपाई रक्कम थकबाकीपोटी समायोजित करण्याचे मंच आदेश देत आहे. थकबाकी नसेल तर उर्वरित रक्कम ग्राहकास रोखीने देण्याचे मंच आदेश देत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२) ग्राहकाची ठराविक कालावधीत मीटर बसविण्याची मागणी, मीटर दि. १०.१.२०१२ ला बसविल्यामुळे पूर्ण झाली आहे.

३) मीटर बसविण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाई रक्कम रु. २५००/- ग्राहकास वि.प.ने द्यावी. त्याचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम थकबाकी असेल तर त्यापोटी जमा करावी, थकबाकी नसेल तर उर्वरित रक्कम ग्राहकास रोखीने द्यावी, तसा अहवाल मंचास सादर करावा.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प.यांनी मंचास कळवावे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com